## राज्य निवडणूक आयोग

क्र. रानिआ-१०९५/३२२६/९५/पंरा,
नविन प्रशासकीय भवन,
मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२,
दिनांक १६ मे १९९५.

प्रति,

जिल्हाधिकारी, नाशिक,
नाशिक

**विषय :** ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुका–९५
मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम ३७ अनुसार प्रसिद्ध झालेल्या अधिसूचनेत चुकीची दुरुस्ती करण्याबाबतची शक्ती प्रदान करण्याबाबत.

**संदर्भ :** जिल्हाधिकारी नाशिक यांचे क्रमांक कक्ष-२ ग्रा. पं. का. वि ३९०/९५, दिनांक १५ मे १९९५.चे पत्र.

संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, ग्रामपंचायत निवडणुकीचे निकाल मुंबई ग्रामपंचायत निवडणुका नियम, १९५९ मधील नियम ३७ खालील तरतुदीनुसार प्रसिद्ध करण्याविषयीचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले असल्यामुळे नियम ३७ च्या परंतुकातील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी यांना नावे प्रसिद्ध करण्यापूर्वी तीत काही चुका आढळल्यास त्या दुरुस्त करण्याचा अधिकार पोचतो. तथापि, याविषयी काही शंका असल्यास, सदरचा अधिकार जिल्हाधिकारी, यांना प्रदान करण्यात येत आहे. त्याप्रमाणे जेथे आवश्यक असेल त्याप्रमाणे या अधिकाराचा वापर करता येईल.

**(दे. ना. चौधरी)**
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र.

प्रत :

सर्व जिल्हाधिकारी यांना अग्रेषित.